RNI No. MAHBIL /2009/40124

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ११, अंक १९(२)] शुक्रवार, जुलै १८, २०२५/आषाढ २७, शके १९४७ [पृष्ठे ६, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ८९**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानपरिषदेत दिनांक **१८ जुलै २०२५** रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानपरिषद नियम **१११** अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. C. BILL No. X OF 2025.**

A BILL

TO PROVIDE FOR THE ESTABLISHMENT OF A SECONDARY VETERINARY COUNCIL IN THE STATE OF MAHARASHTRA.

**सन २०२५ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक १०.**

**महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याची तरतूद करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्रात १ लाख ८० हजार पदविकाधारक आणि प्रमाणपत्रधारक हे भारतीय पशुवैद्यकीय कायद्यानुसार राज्यातील पशु-पक्षांना दुय्यम पशुवैद्यकीय सेवा देत असताना त्यांच्या लघु पशुवैद्यकीय सेवेस कायद्याचे पुरेसे संरक्षण नसल्याने संबंधितांना ग्रामीण भागात सेवा देताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो, आणि,

ज्याअर्थी सदर व्यावसायिकांची महाराष्ट्र पशुवैद्यकीय व्यवसाय कायदा, १९७१ मधील तरतुदीनुसार होत असणारी व्यावसायिक नोंदणी भारतीय पशुवैद्यकीय परिषद कायदा १९८४ मध्ये करण्यात आलेल्या तरतुदीमुळे रद्द करण्यात आली, आणि

ज्याअर्थी, शेतकऱ्यांच्या पशुधनास सर्पदंश, संसर्गिक आजार, जुनोसिस (जनावारांपासून माणसाला होणारे रोग), रेबीज व तत्सम रोगांविरुद्ध सदर व्यावसायिकांना स्वतंत्रपणे उपचार व योग्य औषधोपचारांद्वारे रोगप्रतिबंधक उपाययोजना करता येत नसणे, आणि,

ज्याअर्थी सहजरित्या उपलब्ध होणाऱ्या व माफक दरात सेवा देणाऱ्या राज्यातील पशुवैद्यकीय व्यावसायिकांना कायद्याचे संरक्षण मिळण्यासाठी, तसेच राज्यातील पदविकाधारक, प्रमाणपत्रधारक, पशुवैद्यक व्यावसायिकांची व्यवसाय नोंदणी तसेच, त्यांना योग्य व्यवसाय पूरक प्रशिक्षण देण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या इतर विवक्षित प्रयोजनांसाठी महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याकरिता तरतूद करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या शहात्तराव्या वर्षी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करण्याबाबत तरतूद करण्यासाठी अधिनियम, २०२५ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे निश्चित करील अशा दिनांकास अंमलात येईल.

व्याख्या

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ख) "परिषद" याचा अर्थ कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय व्यावसायिक नोंदणी परिषद असा आहे;

(ग) "दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय व्यावसायिक" याचा अर्थ पशुधन पर्यवेक्षक, चारा विकास पर्यवेक्षक, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी, कृत्रिम गर्भाधान तंत्रज्ञ आणि महाराष्ट्र राज्यातील शासकीय, निमशासकीय, सहकारी आणि खाजगी आस्थापनांमध्ये या श्रेणी अंतर्गत येणारे इतर कोणतेही पद;

(घ) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ड.) "नोंदणी" याचा अर्थ कलम १० अन्वये केलेली नोंदणी, असा आहे;

(च) "नोंदणीकृत" याचा अर्थ कलम १० च्या तरतुदीनुसार केलेली नोंदणी असा आहे;

(छ) "नोंदणीकृत पशुवैद्यकीय व्यावसायिक" म्हणजे महाराष्ट्र राज्य पशुवैद्यकीय परिषद नोंदणी अधिनियमांतर्गत नोंदणीकृत व्यावसायिक व्यक्ती, असा आहे ;

(ज) "अनोंदणीकृत" याचा अर्थ कलम १० च्या तरतुदीनुसार नोंदणी न केलेला, असा आहे ;

(झ) "शैक्षणिक परिषद" याचा अर्थ या अधिनियमांतर्गत विहित उद्देशासाठी परिषदेने नियुक्त केलेली संस्था, असा आहे ;

(त्र) "परीक्षा परिषद" याचा अर्थ शैक्षणिक प्रशिक्षण आयोजन आणि नियंत्रणाच्या उद्देशाने परिषदेने नियुक्त केलेली संस्था यांची परीक्षा व परीक्षेसंबंधीची पूरक कृती, असा आहे.

**३.** (१) या अधिनियमान्वये नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन आणि दुग्ध व्यवसाय व्यावसायिक नोंदणी परिषद या नावाने ओळखली जाणारी परिषद स्थापन करण्यात येईल, ती शाश्वत उत्तराधिकार आणि सामाईक शिक्का असलेली संस्था असेल आणि त्या नावाने दावा किंवा खटला दाखल केला जाईल. महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन दुग्ध व्यवसाय कर्मचारी नोंदणी परिषदेची स्थापना.

(२) महाराष्ट्र राज्य दुय्यम पशुवैद्यकीय पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व कर्मचारी नोंदणी परिषदेमध्ये पुढीलप्रमाणे सदस्यांचा समावेश असेल :—

(क) महाराष्ट्र राज्याचे "पशुसंवर्धन आयुक्त", जे परिषदेचे पदसिद्ध अध्यक्ष असतील ;

(ख) "अतिरिक्त आयुक्त पशुसंवर्धन" या पदाच्या खाली नसलेल्या सेवानिवृत्त व्यक्तींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(ग) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला महाराष्ट्र शासनाच्या अन्न व औषध प्रशासन विभागातील सह आयुक्त पदाच्या खालील पद नसलेला एक सदस्य;

(घ) राज्यातील सहकारी जिल्हा दूध महासंघाच्या व्यवस्थापकीय संचालकांपैकी राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(ड.) भारतीय पशुवैद्यकीय परिषद अधिनियम, १९८४ (१९८४ चा ५२) च्या तरतुदीनुसार नोंदणीकृत पशुवैद्यकीय चिकित्सकांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(च) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्याशी संलग्न पशुवैद्यकीय निम्न शिक्षण/पशुवैद्यकीय महाविद्यालयांच्या अधिष्ठात्यांमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(छ) महाराष्ट्र तंत्रशिक्षण परीक्षा मंडळाच्या सदस्यांपैकी राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(ज) या अधिनियमांतर्गत नोंदणी केलेल्या व्यक्तींमधून राज्य शासनाने नामनिर्देशित केलेले दोन सदस्य, त्यातील एक महिला सदस्य असेल;

(झ) या अधिनियमांतर्गत नोंदणी केलेल्या व्यक्तींमधून चार सदस्य निवडले जातील, त्यातील दोन महिला सदस्य असतील;

(त्र) महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांपैकी राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(ट) महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सदस्यांपैकी राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक सदस्य;

(ठ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेला एक लोकसभा सदस्य.

(३) परिषदेच्या सदस्यांची निवड राज्य शासन राजपत्राद्वारे अधिसूचित करतील.

**४.** (१) सदर परिषदेच्या पदसिद्ध सदस्याव्यतिरिक्त परिषदेच्या इतर सदस्याचा कार्यकाळ या अधिनियमातील कलम ३ च्या पोट-कलम ३ अन्वये त्याच्या/तिच्या निवडणुकीच्या किंवा नामनिर्देशन आणि अधिसूचनेच्या दिनांकापासून ५ वर्षांचा असेल; सदस्य पदाचा कार्यकाल.

(२) सदर परिषदेचा पदसिद्ध सदस्यांचा कार्यकाळ तो किंवा ती ज्या पदावर जोपर्यंत आहे तोपर्यंत सुरू राहील ;

(३) या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीला विरोध न करता आणि पदावरून जाणारा सदस्य जोपर्यंत शासन त्याच्या किंवा तिच्या उत्तराधिकाऱ्याचे नामनिर्देशन कलम ३ च्या पोट-कलम (३) अंतर्गत अधिसूचित केले जात नाही तोपर्यंत पदावर राहण्याचे **निर्देश देईल.**

(४) **सदस्य पद जाणारा सदस्य, अन्यथा पात्र असल्यास, पुन्हा निवडून किंवा नामनिर्देशित केला जाऊ शकतो.**

**सदस्यत्व संपुष्टात येणे.**

**५.** परिषदेच्या सदस्याचे पद खालील कारणांमुळे संपुष्टात येईल, :—

(क) जर त्याने/ तीने आपला राजीनामा लिखित स्वरूपात परिषदेच्या अध्यक्षांना सादर केला तर;

(ख) वाजवी कारणाशिवाय परिषदेच्या सलग तीन बैठकांना गैरहजर राहिल्यास;

(ग) तो/ती यांच्यावर कोणत्याही फौजदारी गुन्ह्यासाठी न्यायालयाने शिक्षा ठोठावली असल्यास आणि अशी शिक्षा नंतर रद्द करण्यात आली नाही, परंतु, शासनास योग्य वाटेल अशा कोणत्याही परिस्थितीत, या कलमाची तरतूद लागू होणार नाही, असे निर्देश दिल्यानंतर सदस्याने आपली जागा सोडली नसल्यास;

(घ) ज्या सदस्याच्या बाबतीत कलम ३ च्या पोट-कलम (२) मधील खंड (ड.), (ज) आणि (झ) मध्ये संदर्भ दिल्यास तो नोंदणीकृत पशुवैद्यकीय व्यवसायी होणार नाही आणि सदस्यत्व रद्द होईल.

**सदस्यांची रिक्त जागा भरणे.**

**६.** निवडून आलेला किंवा नामनिर्देशित झालेला सदस्य किंवा सदस्यांचा संच कलम ५ च्या तरतुदीनुसार किंवा मृत्यू, राजीनामा किंवा अन्य कारणामुळे सदस्यांचे पद रिक्त होते, तेव्हा ती जागा निवडून किंवा नामनिर्देशित करून, यथास्थिती शासनाद्वारे भरली जाईल.

**परिषदेच्या निबंधकाची निवड.**

**७.** (१) शासनाच्या पूर्व परवानगीने परिषद :—

(क) पूर्णवेळ किंवा मानधनाच्या आधारावर किंवा विदेशी सेवेच्या अटीवर शासन प्रतिनियुक्तीने निबंधकाची नियुक्ती करेल;

(ख) अशा निबंधकाची रजा मंजूर करू शकते आणि त्याच्या जागी काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नियुक्ती करू शकते; आणि

(ज) निबंधकाचे आणि त्याच्या जागी काम करण्यासाठी नियुक्त केलेल्या व्यक्तीचे वेतन आणि भत्ते परिषद ठरवू शकेल.

(२) परिषद अशा इतर अधिकारी आणि अशा मंत्रालयीन कर्मचारी आणि सेवकांची (गट ड) नियुक्ती करू शकते, जे या अधिनियमाच्या उद्देशासाठी आवश्यक वाटतील आणि त्यांना परिषद ठरवेल तसे वेतन आणि भत्ते देईल.

(३) निबंधक परिषदेचे सचिव म्हणून काम करतील.

(४) **खंड (क) व खंड (ख) अंतर्गत नियुक्त केलेली प्रत्येक व्यक्ती भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार लोकसेवक असल्याचे मानले जाईल.**

**कामकाजाशी संबंधित नियम बनविण्याचा अधिकार.**

**८.** १. परिषद या अधिनियमाशी सुसंगत आणि त्याखालील सर्व किंवा खालीलपैकी कोणत्याही बाबींची तरतूद करण्यासाठी नियमावली बनवू शकेल :—

(१) भेटीची वेळ आणि ठिकाण;

(२) ज्या प्रकरणांमध्ये बैठकीची सूचना दिली जाईल;

(३) सभेतील होणारे कामकाज आणि सभेचे कामकाज तहकूब करण्याच्या नोंदी;

(४) सभेतील कायदेशीर कामकाजासाठी आवश्यक सभासदांची गणसंख्या ठरविणे;

(५) शैक्षणिक परिषद, परीक्षा परिषद आणि कोणत्याही विषयाशी संबंधित, कोणत्याही कारणासाठी उपसमित्यांची नियुक्ती आणि गठित करण्याचा परिषदेला अधिकार दिलेला असेल. तसेच परिषदेचे सदस्य नसलेल्या आणि कोणत्याही विशिष्ट बाबतीत सल्ला देण्यास विशेष पात्र असलेल्या व्यक्तीं बाबत;

(६) परिषदेच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी सदस्यांना कोणतेही शुल्क आणि प्रवास भत्ते देणे;

(७) परिषदेच्या शिक्क्याचा ताबा आणि तो ज्या उद्देशासाठी वापरला जाईल;

(८) ज्या व्यक्तींद्वारे या अधिनियमांतर्गत पैशाच्या पावतीसाठी परिषदेच्या वतीने पावत्या दिल्या जातील; आणि

(९) नियुक्ती, कर्तव्ये, अधिकार, रजा निलंबन, अधिकारी आणि सेवकांना काढून टाकणे.

२. उप-कलम (१) अंतर्गत केलेले नियम शासनाद्वारे पुष्टी होईपर्यंत आणि महाराष्ट्र राजपत्रात प्रकाशित होईपर्यंत प्रभावी होणार नाहीत.

**९.** परिषदेची कोणतीही कृती किंवा कार्यवाही, केवळ परिषदेमध्ये कोणतीही जागा रिक्त असल्याच्या कारणास्तव किंवा खटल्याच्या गुणवत्तेवर परिणाम न करणाऱ्या कोणत्याही दोष किंवा अनियमिततेमुळे अवैध ठरणार नाही.

अवैध कार्यवाही न करण्यासाठी रिक्त पदे आणि अनियमितता.

**१०.** या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी परिषदेकडून पात्र दुय्यम पशुवैद्यकीय व्यावसायिक व कर्मचाऱ्यांची नोंदणी करण्यासाठी अटी व शर्ती निश्चित करेल.

अधीनस्थ पशुवैद्यकीय व्यावसायिक किंवा व्यक्तीची नोंदणी.

**११.** निबंधकाद्वारे नोंदणीकृत दुय्यम पशुवैद्यकीय व्यावसायिक व व्यक्तींची योग्य रीतीने नोंद ठेवण्याची जबाबदारी व पद्धत परिषदेकडून निश्चित केली जाईल.

नोंदी ठेवणे.

**१२.** अपात्रतेचे विविध निकष व सबळ पुराव्यांच्या आधारे नोंदणी केलेल्या दुय्यम पशुवैद्यकीय कर्मचारी किंवा व्यावसायिक यांच्या बाबत परिषदेचे मत नकारात्मक झाल्यास अशा व्यक्ती किंवा व्यावसायिकांची परिषदेतील नोंद रद्द करण्याबाबत योग्य ती नियमावली परिषद तयार करेल.

नोंदी रद्द करणे.

**१३.** हा अधिनियम लागू झाल्यानंतर परिषदेच्या कार्यक्षेत्रात परिषदेकडे नोंद नसलेल्या कर्मचाऱ्यांना दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय सेवा क्षेत्रात काम करण्यास परिषदेमार्फत प्रतिबंध करण्यात येईल.

प्रतिबंध करण्याचा अधिकार.

**१४.** (१) राज्य शासनास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक नियम करता येतील.

नियम करण्याचा अधिकार.

(२) ह्या अधिनियमाद्वारे करण्यात आलेल्या प्रत्येक नियम, तो तयार करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर राज्य विधान मंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण ३० दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे संमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे निर्णय घेतील तर, असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून अशा फेरबदल केलेल्या स्वरूपात तो नियम अंमलात येईल किंवा यथास्थिती येणार नाही. तथापि असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करावयाचे राहिलेल्या कोणत्या गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

राज्यात मागील काही वर्षांपासून पशुपक्ष्यांमध्ये विविध जातीचे आजार पसरत असल्यामुळे पशुधनाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. अशा वेळी पशुधन वाचवण्यासाठी राज्यातील पशुचिकित्सकांची संख्या अत्यल्प असल्याने सर्वसामान्य शेतकऱ्यांना मुबलक व माफक दरात पशुवैद्यकीय सेवा मिळणे अवघड होत आहे. तसेच कोणत्याही साथीच्या रोगांचा वेळीच अटकाव न केल्याने प्राण्यांमार्फत माणसांना होणाऱ्या आजारात देखील वाढ झाली असून पशु-पक्षी व मानव जातीच्या जीवनास मोठा धोका निर्माण होत आहे. अनेक वेळा प्राण्यांच्या आजाराचे वेळीच व योग्य निदान न झाल्याने देखील पशुधन दगावते. आजही ग्रामीण भागामध्ये दुय्यम पशुवैद्यकीय सेवा पुरविणारे जवळपास दोन लाख कर्मचारी/व्यावसायिक संकटकाळी शेतकऱ्यांच्या सेवेसाठी तात्काळ हजर असतात. मात्र त्यांना कायद्याच्या अधीन राहून पशुवैद्यकीय सेवा पुरवण्यात अनेक अडचणी येत आहेत. अनेक वेळा महत्त्वाची औषधे खरेदी न करता आल्याने वेळेवर पशुधनास उपचार करण्यात मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होतात. त्यामुळे सदर दुय्यम पशुवैद्यकीय, पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय क्षेत्रातील कर्मचारी व व्यावसायिकांना मूलभूत प्रशिक्षण व काम करताना कायद्याचे संरक्षण देण्यासाठी आणि राज्यातील शेतकऱ्यांना मुबलक व माफक दरातील दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा कायम उपलब्ध व्हावी यासाठी राज्यात दुय्यम पशुवैद्यकीय परिषद स्थापन करणे इष्ट आहे.

वरील उद्दिष्टे साध्य करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक १ जुलै, २०२५.

**डॉ. मनिषा कायंदे,**
प्रभारी सदस्या.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक १८ जुलै, २०२५.

**डॉ. विलास आठवले,**
सचिव-३,
महाराष्ट्र विधानपरिषद.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT PRESS AND BOOK DEPOT, CIVIL LINES, NAGPUR-440 001 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI-400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.